# लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,
# धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२
# दूरध्वनी क्र. (०२२) २२०८८ ७००/७४९/१०४/१०५

Email: scc-mumbai@bhc.gov.in

## दरपत्रक सुचना

लघुवाद न्यायालय, मुंबई या न्यायालयाच्या धोबी तलाव, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२ येथील मुख्य कार्यालयातील जुनी व नविन इमारत तसेच वांद्रे शाखा, भास्कर इमारत, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथील तिसरा मजला ते आठवा मजला येथील न्यायालयीन कक्षांमधील ध्वनीक्षेपक यंत्रणेची वार्षिक देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी (Non Comprehensive) ठेकेदारांकडून सिलबंद स्वरुपात दरपत्रके मागविण्यात येत असून त्याचा विहीत नमुना, सविस्तर तपशील, अटी व शर्ती शासनाच्या http://www.bombayhighcourt.nic.in व http://ecourts.gov.in//small-cause या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

तरी इच्छुक ठेकेदारांनी आपली दरपत्रके विहित नमुन्यात **मोहोरबंद लखोटयात** त्या लखोटयाच्या वरच्या भागावर मोठ्या अक्षरात **"ध्वनीक्षेपक यंत्रणेच्या वार्षिक देखभाल व दुरुस्तीसाठीचे दरपत्रक"** असे लिहून तो **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००२"** यांच्याकडे **दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० पर्यंत दुपारी ०२.००** वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा पध्दतीने पाठवाव्यात. तद्नंतर आलेल्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

तसेच दिनांक १७ फेब्रुवारी, २०२० रोजी संध्याकाळी ५.०० वाजता या न्यायालयाच्या संबंधित समिती समोर उघडण्यात येतील याची कृपया नोंद घ्यावी. **दरपत्रके स्विकृत करण्याचा अथवा रद्द करण्याचा/नाकारण्याचा अंतिम अधिकार हा मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांचा असेल.**

सही/-
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई

लघुवाद न्यायालय, }
मुंबई: ३१ जानेवारी,२०२० }

# लघुवाद न्यायालय, लोकमान्य टिळक मार्ग,
# धोबी तलाव, काळबादेवी, मुंबई - ४०० ००२
# दरपत्रक सुचना दिनांक ३१ जानेवारी, २०२०

## : ध्वनीक्षेपक यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्तीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| १. | ध्वनीक्षेपक यंत्रणेची देखभाल व दुरुस्तीचा कालावधी एक वर्षासाठी आहे. |
| २. | दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने/कंपनीने आयकर रिटर्न भरले बाबत मागील तीन वर्षांच्या साक्षांकित छायाप्रती, सेवाकर प्रमाणपत्राची छायाप्रत, पॅन कार्ड, जी.एस.टी. क्रमांक इत्यादी कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती दरपत्रकांसोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच त्यांचे पुर्ण पत्रव्यवहाराचा पत्ता, ई-मेल आयडी, दुरध्वनी क्रमाक/भ्रमणध्वनी क्रमाक दरपत्रक पाकीटावर नमूद करावे. |
| ३. | दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने/कंपनीने यापूर्वी ज्या ठिकाणी काम केले आहे त्या कामाचा तपशील व सदर संस्थेने/कार्यालयाने वितरित केलेले सदर कामाबाबतचे प्रमाणपत्र/पत्र दरपत्रकासोबत सादर करणे आवश्यक आहे. |
| ४. | सुक्ष्म व लघु, मध्यम उद्योग विकास अधिनियम - २००६ अंतर्गत उत्पादक म्हणुन नोंदणीकृत असलेल्या सुक्ष्म व लघु उत्पादक उद्योगांना व शासकीय मंडळ/महामंडळ/उपक्रमांतर्गत नोंदणीकृत असलेले उत्पादक व पुरवठादार यांना निविदा शुल्क व बयाना रक्कम भरण्यापासून सूट देण्यात आली आहे यामध्ये महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ/महासंघ हे वगळता इतर नोंदणीकृत पुरवठादारांना उत्पादकाकडून अधिकृत विक्रेता असल्याचे प्राधिकार पत्र सादर करणे आवश्यक राहील. |
| ५. | प्राप्त झालेल्या दरपत्रकामधील दराप्रमाणे या न्यायालयासाठी आवश्यक असणाऱ्या एकुण नगांनुसार एकुण रक्कमेचा अंतिम तक्ता तयार करण्यात येईल व त्यानुसार ठेकेदारास सदरचे काम देण्यात येईल. |
| ६. | दरपत्रक रक्कम म्हणुन रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त) (विनापरतावा) व अनामत रक्कम म्हणुन रुपये ५,०००/- (रुपये पाच हजार फकत) (परतफेडीस पात्र) चे धनाकर्ष(डी.डी.) दरपत्रकासोबत वेगळे देणे आवश्यक आहेत. सदरचा धनाकर्ष **"प्रबंधक, लघुवाद न्यायालय, मुंबई - ०२"** या नावाने वरील प्रमाणे धनाकर्ष (डी.डी.) सोबत वेगळे दिलेले नसतील तर सदर दरपत्रक स्विकारली जाणार नाहीत. जे दरपत्रक स्विकारले जाईल त्यांची अनामत रक्कम करार संपेपर्यंत ठेवण्यात येईल व इतर दरपत्रक धारकांची अनामत रक्कम त्वरीत परत करण्यात येईल. |
| ७. | मंजूर झालेल्या दरपत्रकाच्या ठेकेदाराने दुरुस्तीसाठी वापरण्यांत येणाऱ्या वस्तु (Items) चांगल्या प्रतीच्या व निर्दोष असल्याबाबतची हमी देणे आवश्यक आहे. सदर काम हे फकत सेवा देण्यासाठी आहे. (Non Comprehensive) |

| | |
|---|---|
| ८. | ज्यांचे दरपत्रक मंजूर होईन त्यांनी सर्व ध्वनीक्षेपक यंत्राचे प्रत्येक महिन्याला परीक्षण करणे आवश्यक आहे. तसेच ज्यावेळी काही दुरुस्तीची आवश्यकता असेल तेव्हा संपर्क केल्यावर त्वरीत दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच न्यायालयाच्या काही विशेष कार्यक्रमाच्या वेळी त्यांचे तंत्रज्ञ कार्यक्रम संपेपर्यंत हजर ठेवणे आवश्यक आहे. |
| ९. | दरपत्रकामध्ये दर्शविलेली न्यायालयीन कक्षांची/ध्वनीक्षेपकांची व इतर साहित्याची संख्या कमी-जास्त होण्याची शक्यता आहे. त्यानुसार ठेकेदाराने त्याचे देयक सादर करावयाचे आहे. |
| १०. | दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेने/कंपनीने दरपत्रकासोबत त्यांचे दरपत्रक मंजूर झाल्यास वरील सर्व अटीं मंजूर असल्याचे व त्या अटींचे पालन करण्यात येईल असे लेखी हमीपत्र द्यावे लागेल. |
| ११. | करार करणाऱ्या संस्थेने/कंपनीने ठेकेदारास दर ६ महिन्याने देयक सादर केल्यानंतर त्याचे प्रदान करण्यांत येईल. |
| १२. | या संदर्भातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार मा. मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय, मुंबई यांना असतील. |

सही/-
अप्पर प्रबंधक
लघुवाद न्यायालय, मुंबई

लघुवाद न्यायालय, }
मुंबई: ३१ जानेवारी, २०२०}

**DETAILED INFORMATION OF MIKE SYSTEM IN THE COURT OF SMALL CAUSES, MUMBAI.**

| Sr. | Description | Quantity | Rate with G.S.T. per Unit/Meter (in Rs.) | Gross Amount (in Rs.) |
|---|---|---|---|---|
| 1. | Ahuja Make Amplifier Model No.SSB-60EM of 60 Watts | 40 Nos. | | |
| 2. | Ahuja Make Speaker Model No.SCM-15T/10W/100V | 160 Nos. | | |
| 3. | Ahuja Mike Model No.GM - 611M | 126 Nos. | | |
| 4. | Ahuja Mike – Base (Stand) Model No.GMB-6C | 126 Nos. | | |